| MHAH210005432012 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०६/०७/२०१२ |
| | नोंदणी दिनांक | : | ०६/०७/२०१२ |
| | निकाल दिनांक | : | १२/०५/२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>१३ १० ०६ |

**भाग–अ**

Form No.XXXII

(Title pa ge of Judgment )

(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रमांक ०२, जामखेड, जि. अ.नगर.**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती अनुश्री बी. फंड)**

**नियमीत फौजदारी प्रकरण क्रमांक ११६/२०१२ निशाणी क्रमांक ५५**

**गुन्हा क्रमांक I–८१/२०१२, भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ सह वाचणीय कलम ३४, भारतीय वन कायद्याचे कलम ४१ व ४२ तसेच महाराष्ट्र वन कायदयाचे कलम ३, ६६ व ८२ आन्वये, पोलीस ठाणे, जामखेड.**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | }<br>}<br>} | महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>जामखेड, ता. जामखेड<br>जि. अहमदनगर. |
| **सरकारतर्फे** | }<br>} | विद्वान श्री. इ. ए. पठाण,<br>विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| | **:: विरुद्ध ::** | |
| **आरोपी** | }<br>}<br>} | १. **शहाजी भगवान माने**,<br>वय–३५ वर्षे, व्यवसाय–निरंक,<br>रा. कैकाडी गल्ली, जामखेड, जि. अहमदनगर |
| | }<br>}<br>} | २. **वसंत साहेबराव जाधव**,<br>वय–२४ वर्षे, व्यवसाय–निरंक,<br>रा. कैकाडी गल्ली, जामखेड, जि. अहमदनगर |
| **आरोपींतर्फे** | } | विद्वान विधिज्ञ श्री. एन एल बोरा<br>विद्वान विधिज्ञ श्री. एच एन डोके |

**भाग–'ब'**

(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | : | ०४/०६/२०१२ |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल दिनांक | : | ०४/०६/२०१२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | ०६/०७/२०१२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | ०४/०७/२०१३ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | : | २७/११/२०२४ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १२/०५/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | | निरंक |

**आरोपींचा तपशील**

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शहाजी भगवान माने | ०४/०६/२०१२ | ०६/०६/२०१२ | भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ सह वाचणीय कलम ३४, भारतीय वन कायद्याचे कलम ४१ व ४२ आन्वये | निर्दोष सोडले | -- | -- |
| २. | वसंत साहेबराव जाधव | ०४/०६/२०१२ | ०६/०६/२०१२ | | | | |

**- न्या य नि र्ण य -**

**(आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी पारित)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ सह वाचणीय कलम ३४, भारतीय वन कायद्याचे कलम ४१ व ४२ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे-**

**०२.** दिनांक ०४/०६/२०१२ रोजी दुपारी १४.०० वाजण्याच्या सुमारास तक्रारदार हे बीड कॉर्नर, जामखेड येथे असतांना त्यांना आरोपी क्रमांक ०१ व ०२ हे बीडचे बाजुकडून एका एलएमएल क्रिडम कंपनीच्या

मोटरसायकलवरुन येतांना दिसले. त्यावेळी आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांच्या मध्ये एक पांढऱ्या रंगाची पिशवी तक्रारदार यांना दिसली. तक्रारदार यांना संशय आल्याने त्यांनी सदर मोटरसायकल थांबवली व आरोपींकडील पांढऱ्या पिशवीची झडती घेतली असता त्यांना त्यामध्ये ओलसर चंदनाची लाकडे मिळून आली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेकडे चंदनाची लाकडे तसेच मोटरसायकल बाबत विचारणा केली असता आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांनी त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे तक्रारदार यांनी आरोपींचेविरुध्द जामखेड पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली.

**०३.** त्यानंतर आरोपींचे विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ सह वाचणीय कलम ३४, भारतीय वन कायद्याचे कलम ४१ व ४२ तसेच महाराष्ट्र वन कायदयाचे कलम ३, ६६ व ८२ आन्वये गुन्हा रजि. क्रमांक ८१/२०१२ नोंदविण्यात आला. प्रस्तुत गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. आर के नाचण, यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान तपासिक अंमलदार यांनी सर्वप्रथम घटनास्थळी जावून दिसत्या परिस्थितीप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा केला, महत्वपूर्ण साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे तपासटिपणे नोंदविली, महत्वपूर्ण कागदपत्रे हस्तगत केली व शेवटी आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा आल्याने, त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** दिनांक ०४/०७/२०१३ रोजी माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ सह वाचणीय कलम ३४ व भारतीय वन कायद्याचे कलम ४१ व ४२ चे अपराधासाठी निशाणी क्रमांक ११ अन्वये दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपींना वाचून दाखवून ते समजावून सांगण्यात आले असता, त्यांनी गुन्हा अमान्य करुन संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** प्रस्तुतचे प्रकरण हे १२ वर्षांपेक्षा अधिक जुने असून प्रस्तुत

प्रकरणातील आरोपी क्रमांक ०१ व ०२ हे परागंदा असल्याने दिनांक ०४/०४/२०२६ रोजी या न्यायालयाने निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारीत करण्यात आला व त्या आन्वये आरोपींचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ नुसार निवेदन वगळण्यात आले व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५६ आन्वये आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांच्या गैरहजेरीत प्रस्तुतचे प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**०६.** आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने, बापु आजीनाथ गंभीरे यांना साक्षीदार क्रमांक ०१ म्हणून निशाणी क्रमांक २६ येथे व तक्रारदार विकास रंगनाथ वैराळ यांना साक्षीदार क्रमांक ०२ म्हणून निशाणी क्रमांक ३९ येथे तपासले.

**०७.** अभियोगपक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. इ. ए. पठाण यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. आरोपींतर्फे कोणीही हजर नसल्यामुळे त्यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला नाही.

**०८.** प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप व अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा इत्यादींवरुन खालील प्रश्न माझे विचाराधीन उपस्थित झालेले आहेत, ते प्रश्न आणि त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत:-

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ०४/०६/२०१२ रोजी सुमारे दुपारी २.०० वाजता जामखेड-बीड़ रस्त्यावर, बीड कॉर्नरजवळ, जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर येथे आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ | **...नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | राज्य सरकारच्या ताब्यातील व सरकारची संमती नसताना, रक्कम रुपये ३,०००/– किंमतीचे चंदन (सँडलवुड) ही चल मालमत्ता बेईमानीने घेण्याच्या उद्देशाने हलवली व अशा प्रकारे चोरीचा गुन्हा केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम **३७९ सह वाचणीय कलम ३४** आन्वये अपराध केला ? | |
| **०२.** | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वरील नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी, आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ कलम ४१ अंतर्गत प्रतिबंधित असलेले चंदन त्यांच्या ताब्यात बाळगताना आढळून आले व त्यामुळे भारतीय वन कायदा कलम ४२ अन्वये अपराध केला ? | **...नाही.** |
| **०३.** | काय आदेश ? | **...आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

## विचाराधीन प्रश्न क्रमांक ०१ व ०२ करिता –

**०९.** अभियोग पक्षामार्फत तपासण्यात आलेले पंच साक्षीदार क्रमांक ०१ बापु आजीनाथ गंभीरे यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दिनांक ०४/०६/२०१२ रोजी पोलीसांनी त्यांना जामखेड पोलीस ठाणे येथे बोलाविले होते. त्यावेळी पोलीसांनी त्यांची फक्त एका कागदावर सही घेतली. सदर साक्षीदाराने पंचनाम्यावरील केवळ त्याची सही ओळखली व त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे त्यांना फितुर घोषित करुन त्यांचा उलटतपास घेतला परंतु अभियोग पक्षास उपयुक्त होईल असा कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही.

**१०.** त्यानंतर अभियोग पक्षाने आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्याकरीता तक्रारदार विकास रंगनाथ वैराळ यांना साक्षीदार क्रमांक ०२ म्हणून

निशाणी क्रमांक ३९ येथे तपासले. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दिनांक ०४/०६/२०१२ रोजी ते जामखेड पोलीस ठाणे येथे कार्यरत असतांना त्यांना व पोलीस कॉस्टेबल साने यांना मोटार वाहन प्रकरणांबाबत कारवाई करण्याचे आदेश मिळाले होते. त्यानंतर दुपारी २.०० वाजता बीड कॉर्नर येथे दोन इसम त्यांना दुचाकीवरुन येतांना दिसले. त्यांच्या ताब्यात पांढऱ्या रंगाची पिशवी असल्याने संशयावरुन त्यांना थांबवून त्यांची तपासणी केली असता, त्या पिशवीत अंदाजे दीड किलो चंदनाचे लाकडे आढळून आली. चौकशीत आरोपींची नावे शहाजी भगवान माने व वसंत साहेबराव जाधव अशी समजली. त्यानंतर आरोपींकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्यांनी चंदनाची लाकडे व दुचाकी सह आरोपींना पोलीस ठाणे येथे नेवून पंचांसमक्ष जप्ती पंचनामा केला.

**११.** साक्षीदार क्रमांक ०२ विकास यांच्या उलटतपासामध्ये काही बाबी स्पष्ट झाल्या आहेत. त्यामुध्ये चंदनाच्या लाकडाला विशिष्ट प्रकारची साल असते, परंतु, त्यांनी जप्त केलेल्या लागडाची अशी कोणतीही खात्री केलेली नाही. तसेच, घटनेच्या दिवशी त्यांनी मोटार वाहन कायदयाअंतर्गत कोणतीही कार्यवाही केली नव्हती व त्यांना कोणताही लेखी आदेश दिलेला नव्हता. साक्षीदार क्रमांक ०२ विकास यांनी पुढे मान्य केले की, आरोपींनी लाकडे कोठून आणली किंवा ती कोणाच्या मालकीची आहे याबाबत त्यांनी कोणतीही चौकशी केली नाही. तसेच जप्त केलेल्या लाकडाचे वजन, संख्या किंवा माप याबाबतही त्यांना माहिती देता आली नाही. याशिवाय, ते चंदन ओळखण्यास तज्ञ नसल्याचेही त्यांनी मान्य केले.

**१२.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्रमांक ०१ बापु यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही त्यांनी स्पष्टपणे नमुद केले आहे की, त्यांची सही पोलीस ठाणे येथे घेण्यात आली होती. त्यामुळे पंचनामा प्रक्रीयेवरही संशय निर्माण होता.

**१३.** साक्षीदार क्रमांक ०२ विकास यांनी जप्ती पंचनामा पंचांसमक्ष केल्याचे सांगितले असले तरी, पंच साक्षीदाराने ते नाकारले आहे. त्यामुळे दोन्हीं

साक्षींमध्ये विसंगती दिसून येते. त्याशिवाय जप्त करण्यात आलेला मुददेमाल खरोखरच चंदनाचे लाकुड आहे हे दर्शविणारा कोणताही वैज्ञानिक किंवा तज्ञांचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच चंदनाचे लाकुड असल्याचे सिध्द करण्यासाठी वन विभाग किंवा तज्ञ व्यक्तींचा अहवाल आवश्यक असतांना तो अभिलेखावर उपलब्ध नाही, त्यामुळे मुददेमालाचे स्वरुप शंकास्पद राहते.

**१४.** एकंदरीत अभियोग पक्षाच्या दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीमध्ये गंभीर विसंगती आढळून येतात. तसेच तपास प्रक्रीयेमध्ये देखील तृटी आढळून येतात. आरोपींकडून जप्त केलेल्या लाकडांचा स्त्रोत, त्याची मालकी, तसेच वाहतुकीचे कारण याबाबत कोणतीही ठोस चौकशी करण्यात आलेली नाही. तसेच जप्त वाहनाबाबत कोणतीही खात्रीशीर माहिती नोंदविण्यात आलेली नाही.

**१५.** फौजदारी विधी तत्वानुसार संशयाच्या पलिकडे जाऊन गुन्हा सिद्ध करण्याची पुर्णपणे जबाबदारी अभियोगपक्षाची असते. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने सादर केलेले तोंडी व दस्तऐवजी पुरावे आरोपींचा गुन्हयातील सहभाग सिध्द करण्यास अपुरे ठरतात. आरोपींचा गुन्हयातील समावेश दर्शविणारा कोणताही सकारात्मक पुरावा अभिलेखावर न आल्याने केवळ दुजोरात्मक स्वरुपाच्या पुराव्यावरुन आरोपींचा गुन्हयातील समावेशाबाबत निष्कर्श काढता येणार नाही. त्यामुळे मी **विचाराधीन प्रश्न क्रमांक ०१ व ०२ चे उत्तर नाही** असे देते.

**विचाराधीन प्रश्न क्रमांक ०३ करिता –**

**१६.** प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्रमांक ०१ व ०२ हे फरार असून त्यांच्या विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ८२ व ८३ आन्वये उदघोषणा काढण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांची नजिकच्या भविष्यामध्ये मिळण्याची शक्यता दिसून येत नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुत चे प्रकरण १२ वर्षांपेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवून कुठलाही हेतू साध्य होणार नाही. अशा परिस्थितीत भारतीय

नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५६(१) मधील तरतुदींनुसार आरोपींच्या गैरहजेरीमध्ये प्रस्तुत प्रकरणाचा न्यायनिर्णय देणे न्यायोचित ठरते. मुद्दा क्रमांक **०१ व ०२** याचे निष्कर्षावरुन, आरोपी क्रमांक ०१ व ०२ निर्दोष होण्यास पात्र आहेत. तसेच, प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजे ०१ किलो ५०० ग्रॅम वजनाची तथाकथीत चंदनाची ओलसर लाकडे याचा नियमाप्रमाणे नाश करण्याचे आदेश व जप्त मुद्देमाल म्हणजे एलएमएल फ्रीडम कंपनीची सिल्व्हर काळया रंगाची मोटरसायकल जिचा क्रमांक एमएच १६ व्ही ४२८२ ही त्याच्या मुळ मालकास देण्याबाबत आदेश पारित करणे न्यायोचीत होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**:: आ दे श ::**

| | |
|---|---|
| १) | आरोपी क्रमांक **०१. शहाजी भगवान माने व ०२. वसंत साहेबराव जाधव** यांना भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ सह वाचणीय कलम ३४, भारतीय वन कायद्याचे कलम ४१ व ४२ च्या आरोपातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१)] प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २) | आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांचे वैयक्तीक जातमुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३) | अपिलाचा कालावधी संपल्यानंतर जप्त मुद्देमाल म्हणजे ०१ किलो ५०० ग्रॅम वजनाची चंदनाची ओलसर लाकडे याचा, नियमाप्रमाणे नाश करावा. |
| ४) | अपिलाचा कालावधी संपल्यानंतर जप्त मुद्देमाल म्हणजे एलएमएल फ्रीडम कंपनीची सिल्व्हर काळया रंगाची मोटरसायकल जिचा क्रमांक एमएच १६ व्ही ४२८२ ही त्याच्या मुळ मालकास देण्यात यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

**सही/-**
**(अनुश्री ब. फंड)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०२),
**जामखेड**.

दिनांक:-१२/०५/२०२६.
ठिकाण:- जामखेड.

**भाग-'क'**

(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/ आरोपीतर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी;

### अ. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक ०१ | बापु आजिनाथ गंभीरे | पंच साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ०२ | विकास रंगनाथ वैराळ | तक्रारदार |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार/बचाव पक्षाचे साक्षीदार असतील तर

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयीन साक्षीदार, असतील तर

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोगपक्षाचा पुरावा

| निशाणी क्रमांक | कागदत्रांचे वर्णन |
|---|---|
| ४० | फिर्याद |

### ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ. क्रमांक | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | **६३/१२** | ०१ किलो ५०० ग्रॅम वजनाची चंदनाची ओलसर लाकडे सुगंध येत असलेली |
| ०२. | **६३/१२** | एलएमएल फ्रीडम कंपनीची सिल्व्हर काळया रंगाची मोटरसायकल जिचा क्रमांक एमएच १६ व्ही ४२८२ असून चेसिस क्रमांक C7JL372160 व इंजिन क्रमांक ESSJL359463. |

दिनांक:– १२/०५/२०२६.
ठिकाण:– जामखेड.

**सही/–**
**(अनुश्री ब. फंड)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०२),
**जामखेड.**